माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये
## प्राप्त झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक: ५१९/२०१९ व ९४/२०२०**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. हेमंत देवराव गांजरे, ८७, विठ्ठलनगर २, नागपूर-४४००३४ | शिक्षण उपसंचालक कार्यालय, बालभारती बगिच्या जवळ, धंतोली, नागपूर | शिक्षण उपसंचालक कार्यालय, बालभारती बगिच्याजवळ, धंतोली, नागपूर |

**सुनावणी दिनांक २४.०२.२०२५**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ३७२९/२०१८ संदर्भात दिनांक ०१.०४.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केले आहेत. सदर तक्रारीवर दिनांक ३०.०३.२०२२ दिनांक ०८.०८.२०२२, दिनांक १६.११.२०२२ व दिनांक ०१.०६.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर आज दिनांक २४.०२.२०२५ रोजी पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उप निरीक्षक, श्री. संजय बोदाडकर व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री. रविंद्र ज्ञा. पाटील उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ३७२९/२०१८ संदर्भात दिनांक ०१.०४.२०१९ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

“ अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अर्जदारास विलंबाने दिनांक २९.०३.२०१९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. परंतु अर्जदाराचे समाधान झालेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती सदर आदेश प्रापत होताच १५ दिवसात द्यावी. नसल्यास निरंक असे कळवावे. सदर माहितीने अर्जदार यांचे समाधान न झाल्यास किंवा दिलेली माहिती चुकीची/अपूर्ण वाटल्यास त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १८(१) अंतर्गत तक्रार करण्याचा हक्क अबाधित ठेवण्यात येत आहे.” असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत (तक्रार क्र. ५१९/२०१९) मध्ये दिनांक ०१.१०.२०१९ (प्राप्त दिनांक ०१.१०.२०१९) व (तक्रार क्र. ९४/२०२०) मध्ये दिनांक १८.०५.२०२० (प्राप्त दिनांक १८.०५.२०२०) रोजी आयोगाकडे एकुण दोन तक्रार अर्ज दाखल केले आहे। त्यामध्ये “ आयोगाचे आदेश पारीत झाले असूनही प्रपत्र-अ प्रमाणे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अजूनपर्यंत संपूर्ण माहिती दिलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून

माहिती देण्याचे टाळले आहे. तसेच आयोगाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे त्यांचेवर रु. २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी. तसेच मला झालेल्या मानसिक त्रासापोटी रु. १०,००० इतकी नुकसान भरपाई देण्यात यावी ” असे नमुद करुन तक्रार अर्ज सादर केले आहेत.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक ०५.०४.२०२२ अन्वये आयोगाकडे खुलासा सादर करुन त्यामध्ये “या कार्यालयाचे पत्र क्र. शिउस/माध्य/मा.अ./२३०९/१९, दिनांक २९.०३.२०१९ अन्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली असून बाकीची माहिती ही निरंक समजण्यात यावी.” असे नमुद केले आहे.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक ०५.०८.२०२२ अन्वये आयोगाकडे खुलासा सादर केला आहे. त्यांनी त्यामध्ये “अपिलकर्ता यांना दिनांक २९.०३.२०१९ अन्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे आणि दिनांक ०५.०४.२०२२ अन्वये उर्वरित माहिती निरंक असल्याचे अपिलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरहु प्रकरणी शासन परिपत्रक दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करु नये तथा कुठल्याही प्रकारची शास्ती लावू नये. ही न्रम विनंती” असे नमुद केले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता आयोग या निष्कर्षाला येत आहे की, तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.०९.२०१८ च्या माहिती अर्जानुसार “जानेवारी २०१५ पासून कार्यालयातर्फे वैयक्तीकरित्या माझ्या तर्फे तसेच प्रजासत्तका शिक्षक कर्मचारी संघ महाराष्ट्र” राज्य यांचेतर्फे कार्यालयात विविध विषयांच्या बाबतीत दाखल केलेल्या एकुण तक्रारींची विषयावर व दिनांकावर यादी तसेच दाखल केलेल्या एकुण तक्रारीपैकी निपटारा केलेल्या एकुण तक्रारीची यादी” मागितलेली होती. त्यास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २९.०३.२०१९ च्या पत्रान्वये “कार्यालयास प्राप्त प्रजासत्तांक शिक्षक कर्मचारी शिक्षक संघ यांनी केलेल्या तक्रारीची प्रत तथा त्यावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची प्रत तक्रारकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक ०५.०४.२०२२ च्या पत्रान्वये उर्वरित माहिती निरंक असल्याचे तक्रारकर्ता यांना पुनश्च: कळविण्यात आलेले आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती प्राप्त झाली, असे स्पष्ट केले. त्यामुळे सदर प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नसून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
★नागपूर★

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** **नागपूर**
**दिनांक:** **२४.०२.२०२५**

**जा.क्र.**-1943-------**दि.**------------
15 APR 2025

E:\तक्रार क्र. 94/2020 व 519/2020.docx